**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः22.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. भारत आणि कुवेत नेहमीच एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन. जागतिक मागणी पूर्ण करण्यात भारताच्या कुशल प्रतिभेच्या योगदानाचं कौतुक.
2. ईशान्येकडील आर्थिक गरजांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा भर.
3. पोषणयुक्त तांदळावरील जीएसटी दर 5 टक्के कमी करण्याची घोषणा. पाकिटबंद आणि लेबलयुक्त वस्तूंच्या व्याख्येत सुधारणा करण्याची जीएसटी परिषदेची शिफारस.
4. नागपुरात बायो बिटूमेन सामग्रीचा वापर करून पहिल्या पर्यावरणपूरक महामार्गाचं केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि
5. हिमाचल प्रदेशात तीन दिवस थंडीची तीव्र लाट येण्याची हवामान विभागाचा अंदाज

**पंतप्रधान-कुवैत**

भारत आणि कुवेत नेहमीच एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. पंतप्रधान दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर पोहोचल्यानंतर कुवेतमधील शेख साद अल-अब्दुल्ला क्रिडा संकुलामध्ये आयोजित 'हाला मोदी' कार्यक्रमात भारतीय प्रवासी नागरिकांना संबोधित करताना मोदी यांनी कुवेतच्या प्रगतीमध्ये भारतीय समुदायाच्या योगदानाचं कौतुक केलं. 'नवीन कुवेत'ला आवश्यक असलेलं कौशल्य, तंत्रज्ञान, नवकल्पना आणि मनुष्यबळ भारताकडं आहे आणि भारत कुशल प्रतिभेची जगातील मागणी पूर्ण करण्यास तयार असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताला विश्वबंधू म्हणून सादर करताना त्यांनी आर्थिक समावेशन, महिलांच्या नेतृत्वाखालील विकास आणि डिजिटल संपर्क व्यवस्थेमधील देशाच्या प्रगतीवर प्रकाश टाकला. जानेवारी 2025 मध्ये प्रवासी भारतीय दिवस आणि महाकुंभमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधानांनी भारतियांना विशेष आमंत्रण दिलं. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवेतमधील भारतीय कामगारांच्या शिबिरात जाऊन त्यांची भेट घेतली. कुवेतचे उपपंतप्रधान शेख फहद युसेफ सौद अल-सबाह यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. समाज माध्यमांवरील एका संदेशात मोदी यांनी सांगितलं की, त्यांच्या या भेटीमुळं विविध क्षेत्रात भारत-कुवेत मैत्री आणखी भक्कम होईल. 43 वर्षात भारतीय पंतप्रधानांची या आखाती देशाला

झालेली ही पहिलीच भेट आहे. अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्या निमंत्रणावरून मोदी कुवेतच्या दौऱ्यावर आहेत.
पंतप्रधानांनी रामायण आणि महाभारताचे अरबी भाषेत भाषांतर करणारे अब्दुल्ला अल बरुण आणि त्यांचे प्रकाशक अब्दुल लतीफ अल नासेफ यांचीही भेट घेतली. कुवेतचे अमीर आणि युवराज यांच्यासोबत आज स्वतंत्र उच्चस्तरीय बैठका घेण्यापूर्वी पंतप्रधानांना बायन पॅलेस इथं औपचारिक मानवंदना देण्यात येईल. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये शिष्टमंडळ स्तरावर चर्चा होईल. 26व्या अरेबियन गल्फ कपच्या उद्घाटन समारंभालाही पंतप्रधान कुवेतचे अमीर विशेष अतिथी म्हणून मोदी काल उपस्थित होते.

**अमित शहा-त्रिपुरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नाबार्ड, रिझर्व्ह बँक आणि  ईशान्य विकास वित्त महामंडळ यांना ईशान्य राज्यांसाठी वित्तपुरवठा करण्याकरिता स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वं तयार करण्यास सांगितलं आहे. आगरतळा इथं नॉर्थ ईस्टर्न बँकर्स परिषदेला संबोधित करताना, शाह यांनी हा प्रदेश गुंतवणूक आकर्षित करण्याच्या बाबतीत मागील सर्व विक्रम मोडेल विश्वास व्यक्त केला. या प्रदेशाची भौगोलिक स्थिती वेगळी असल्याचं नमूद करुन ते म्हणाले की संपूर्ण देशासाठी समान मार्गदर्शक तत्त्वं असू शकत नाहीत.  तत्पूर्वी, त्रिपुराची राजधानी आगरतळा इथं ईशान्य परिषदेच्या 72 व्या सत्राला संबोधित करताना, शाह म्हणाले की केंद्र सरकारनं ईशान्येकडं विशेष लक्ष दिलं आहे.

**जीएसटी-बैठक**

जीएसटी परिषदेनं पोषणयुक्त तांदळावरील कर दर कमी करून पाच टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे आणि पाकिटबंद आणि लेबल केलेल्या वस्तूंच्या व्याख्येत सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. वस्तू आणि सेवा कर परिषदेची 55 वी बैठक काल राजस्थानमध्ये जैसलमेर इथं झाली. वस्तू आणि सेवा कराशी संबंधित अनेक निर्णय या बैठकीत घेण्यात आले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि वित्त मंत्रालयाचे अधिकारी सहभागी झाले होते. बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सीतारामन म्हणाल्या की जीन थेरपीला जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे. तसंच, दंड आकारणी, बँका आणि गैर-बँकींग वित्त संस्थांच्या विलंबित भरणा शुल्कावर जीएसटी लावला जाणार नाही. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या प्रशिक्षण भागीदारांना जीएसटीमधून सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, परंतु अधिसूचना जारी झाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल असंही सीतारामन यांनी स्पष्ट केलं.

**जर्मनी हल्ला**

जर्मनीत मॅग्डेबर्ग इथं झालेल्या भीषण हल्ल्याचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. या हल्ल्यात पाच लोक ठार तर दोनशेहून अधिक लोक जखमी झाल्याचं वृत्त आहे. जखमींमध्ये सात भारतीयांचाही समावेश होता. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं या संदर्भात जारी केलेल्या निवेदनात, नाताळच्या बाजारात झालेला हा हल्ला भीषण आणि माथेफिरू असल्याचं म्हटलं आहे. जखमी भारतीय नागरिकांवर रुग्णालयात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आलं असल्याचं सुत्रांनी सांगितलं आहे. जर्मनीतील भारतीय दुतावास या हल्ल्यात झालेल्या जखमी झालेल्यांच्या संपर्कात असल्याचही निवेदनात म्हटलं आहे. नाताळाच्या खरेदीसाठी गर्दी केलेल्या बाजारात कार घुसवून शुक्रवारी हा हल्ला झाला होता.

**ध्यानधारणा**

जगभरात काल ध्यानधारणा दिन साजरा करण्यात आला. मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी ध्यानाच्या परिवर्तनीय शक्तीवर भर देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघानं 21 डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिन जाहीर केला आहे. भारताचे राष्ट्रसंघातील प्रतिनिधी पी. हरीश यांनी ध्यान या प्राचीन भारतीय पद्धतीवर प्रकाश टाकला.

ध्यान हा आपल्या जीवनशैलीचा एक भाग असू द्या, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना दिला आहे. मन:शांती आणि सुसंवाद यासाठी ध्यान हा उत्तम मार्ग असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**ध्यानधारणा**

पुण्यातल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी या संस्थेमध्ये पहिल्या ध्यान दिनी साधकांनी चिंतन, चिंतन आणि उपक्रमातून ध्यानाचं महत्त्व अनुभवलं. ज्येष्ठ मानववंशशास्त्रज्ञ आणि गांधीवादी प्रा. मुटाटकर लिखित ‘रामायण’ या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीचं प्रकाशन यावेळी करण्यात आलं. मुटाटकर यांनी ‘रामायण’ या ग्रंथाचा सारांश आणि सद्यस्थितीत त्याचं महत्त्व सांगितलं.

**बायो रस्ता गडकरी**

भारतातील पहिल्या बायो-बिटूमेन सामग्रीचा वापर करून बांधलेल्या नागपूर- मनसर बायपास महामार्गाचं उद्घाटन केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. बिटुमेन सारख्या सामग्रीचा वापर करून बांधलेल्या पर्यावरणपूरक रस्त्यांमुळे रस्तेबांधणीचा खर्च कमी होईल तसंच रोजगार निर्मितीला चालना मिळेल,  तसंच प्रदूषणालाही आळा बसेल असं प्रतिपादन गडकरी यांनी यावेळी केलं. पिकांच्या अवशेषांपासून तयार झालेल्या बिटुमेनच्या वापरापासूनपासून निर्मित हा देशातला पहिला महामार्ग असून तो पारंपरिक डांबरी रस्त्यापेक्षा ४० टक्क्यांनी मजबूत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. नागपूर मनसर राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पातही डांबरामध्ये बायो बिटुमेनचे 15 टक्के मिश्रण करून एक किलोमीटर लांबीचा रस्ता तयार करण्यात आल्याचीं माहिती

गडकरी यांनी दिली. या रस्त्याचं काम केंद्रीय रस्ते संशोधन संस्था आणि पुण्याच्या बॉयोटेक फर्म प्राज उद्योगसमूहाच्या सहकार्यानं बांधण्यात आला आहे. यावेळी जैवनैसर्गिकवायू सारख्या अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून शेतकऱ्यांनी कृषी कचरा आणि बांबूपासून जैवनैसर्गिक वायू तयार करण्याचं आवाहनही गडकरी यांनी केलं.

**लहान दिवस**

उत्तर गोलार्धात हिवाळा सुरू झाल्यानंतर दिवस लहान तर रात्र मोठी असते. सूर्य काल मकरवृत्तावर असल्यानं कालचा म्हणजे 21 डिसेंबरचा दिवस हा सर्वात लहान म्हणजे अकरा तासांचा होता तर रात्र तेरा तासांची होती. सूर्याच्या उत्तरायणाला काल 21 डिसेंबरला प्रारंभ झाला. इथून पुढे हळूहळू दिवसाचा कालावधी वाढत जातो.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान होणाऱ्या आयसीसी करंडक वीस षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज गुजरातच्या वडोदरा इथं आज होणार आहे. हा सामना दुपारी दीड वाजता सुरू होणार आहे. भारतीय महिला क्रिकेट संघानं वेस्ट इंडिजविरूद्धच्या आंतरराष्ट्रीय मालिकेत2-1 असा विजय मिळवला होता. तर पाच वर्षापूर्वी दक्षिण अफ्रिकेविरूद्ध मिळवलेल्या 3-0 अशा विजयाची पुनरावृत्ती करण्याचा संघाचा प्रयत्न असेल.

**आशिया चषक**

तर दुसरीकडे मलेशियातल्या क्वालंलपूर इथं आज एकोणीस वर्षाखाली महिलांच्या वीस षटकांच्या आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताचा सामना बांग्लादेशशी होणार आहे. या सामना सकाळी सुरू झाला आहे. कर्णधार निकी प्रसादच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघ स्पर्धेत अपराजित राहिला आहे. अ गटात अव्वल स्थानी असलेल्या संघानं सुपर फोरमधल्या चार पैकी तीन सामन्यात अव्वल स्थान पटकावलं आहे. नेपाळविरूद्धचा सामनाच केवळ पावसामुळे निकाली लागला नाही.

**थंडीची लाट**

हिमाचल प्रदेशात येत्या तीन दिवस थंडीची तीव्र लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट बाल्टिस्तान, मुझ्झफराबाद क्षेत्रात या भागात याचा प्रभाव जाणवू शकतो. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या बहुतांश भागात काल किमान तापमान 4 ते 8 अंश

सेल्सिअस होतं. तर पंजाबमधल्या आदमपूर भागात पारा 1 पूर्णांक 8 दशांश अंश इतका घसरला होता.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**